**शिकले म्हणजे शहाणपण येतेच असे नाही. शिकलेले लोकही विज्ञान समजून घ्यायला तयार असल्याचे बरेचदा दिसत नाही. शाळेच्या मुख्याध्यापकांना आणि शिक्षकांना तर मुलांचे मानसशास्त्र समजलेच पाहिजे; परंतु शिकलेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करायचाच नसतो, असा चंग काहींनी बांधलेला दिसतो. त्यातून ठाणे जिल्ह्यातील शहापूरसारख्या ठिकाणी घडलेल्या घटनेसारख्या दुर्दैवी घटना घडतात.**

# मुलींच्या प्रतिष्ठेला धक्का

मागोवा

मधुरा कुलकर्णी

अलिकडे ठाणे जिल्ह्यातील शहापूर परिसरातील आर. एस. दमाणी शाळेत विद्यार्थिनींच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी एक लज्जास्पद घटना उघडकीस आली. मासिक पाळी तपासण्याच्या नावाखाली विद्यार्थिनींना कपडे काढायला लावल्याचे उघडकीस आल्यानंतर शाळेतील महिला मुख्याध्यापक आणि परिचारिकेला अटक करण्यात आली. या घटनेविरोधात संतप्त पालकांनी शाळेच्या आवारात निषेध केला. त्यानंतर ठाणे ग्रामीण पोलिसांनी तातडीने कारवाई करत गुन्हा दाखल केला. शाळेच्या बाथरूममधील फरशीवर रक्ताचे



डाग आढळल्याने हे प्रकरण सुरू झाले. खरे तर स्वच्छता कर्मचाऱ्याने ते तिथेच साफ केले असते, तर पुढचे महाभारत घडले नसते; परंतु या कर्मचाऱ्याने त्याचे शूटिंग केले, हा आणखी किळसवाणा प्रकार. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापकाने पाचवी ते दहावीच्या विद्यार्थिनींना एकत्र केले आणि प्रोजेक्टरवर बाथरूममध्ये पडलेले डागांचे फोटो दाखवले आणि विचारले की मासिक पाळी कोणाला येत आहे. हा खरे तर सार्वजनिकरीत्या विचारण्याचा मुद्दा आहे का, हा खरा सवाल आहे. त्यात काही मुलींनी मासिक पाळी येत असल्याचे मान्य केले. त्यातील काही विद्यार्थिनींना एक एक करून बाथरूममध्ये नेण्यात आले. तिथे परिचारिकेला मुख्याध्यापकाने मुलींचे कपडे काढायला लावले आणि त्यांच्या तपासणी करायला लावण्यात आली. हा अनुभव अपमानास्पद होता. मुलींनी ही माहिती पालकांना लगेच दिली, हे बरे झाले. त्यामुळे अमानुषता तरी उघड झाली. पालकांच्या संतापामुळे आणि निदर्शनामुळे पोलिसांना दखल घ्यावी लागली आणि मुख्याध्यापक तसेच परिचारिकेला अटक करावी लागली.

अधिवेशन सुरू असल्यामुळे विधिमंडळातही या प्रकरणाची दखल घेतली गेली. सामाजिक दडपणामुळे शाळेच्या विश्वस्त आणि शिक्षकांवर कारवाई करणे भाग पडले. सर्वांवर लैंगिक छळ, जबरदस्तीने कपडे उतरवणे आणि मुलींचा विनयभंग करणे यासह 'पोक्सो' कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाने ही घटना गांभीर्याने घेत स्वतंत्र चौकशीचे आदेश दिले आहेत. ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी शाळा व्यवस्थापनाकडून स्पष्टीकरण मागितले आणि दोषी आढळल्यास शाळेची मान्यता रद्द केली जाऊ शकते, असे म्हटले. महिला आयोग आणि बाल हक्क संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आणि म्हटले की अशा प्रकरणांमध्ये अटकच नाही, तर संस्थात्मक सुधारणा आवश्यक आहेत. या प्रकरणातील आरोप गंभीर आहेत. दोषी सिद्ध झाल्यास आरोपींना 'पोक्सो' कायद्याअंतर्गत तीन ते सात वर्षांची शिक्षा आणि दंड होऊ शकतो. या प्रकरणाची सुनावणी विशेष न्यायालयात होण्याची शक्यता आहे. ठाण्यातील ही घटना शिक्षण व्यवस्थेची असंवेदनशीलता अधोरेखित करतेच; शिवाय आपल्या शाळा मुलांना सन्मानाने जगायला शिकवत आहेत की लाजेने जगायला शिकवत आहेत, असा प्रश्नही उपस्थित करते. शिक्षक मुलांना योग्य शिक्षण देऊन ज्ञानी बनवतात; परंतु आज काही शिक्षक त्यांचा सन्मान विसरून मुलांवर भलतेच प्रयोग करत आहेत. तपासणीच्या नावाखाली ते मुलींचे कपडे काढण्यासारख्या चुकीच्या कृत्यांमध्ये सहभागी असल्याचे आढळून येते.

या पार्श्वभूमीवर आपल्या मुली सरकारी शाळांमध्ये सुरक्षित नसतील तर त्यांना कुठे शिकवावे, असा प्रश्न उपस्थित होतात. अरुणाचल प्रदेशमधील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील ८८ विद्यार्थिनींना शाळेतील इतर विद्यार्थिनींसमोर कपडे काढण्यास भाग पाडण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापक आणि एका विद्यार्थिनीसाठी अश्लील शब्द वापरण्यात आल्याच्या आरोपानंतर हे करण्यात आले. शाळेतील तीन शिक्षकांवर सहावी आणि आठवीच्या इयत्तेत शिकणाऱ्या ८८ विद्यार्थिनींकडून प्रथम स्पष्टीकरण मागितल्याचा आणि नंतर इतर विद्यार्थिनींसमोर कपडे काढण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. विद्यार्थी संघटनेच्या मदतीने विद्यार्थिनींनी स्थानिक पोलिस ठाण्यात शाळा प्रशासन आणि शिक्षकांविरुद्ध तक्रार दाखल केली. या शाळेत एका विद्यार्थ्याकडे एक कागद सापडला. त्यावर मुख्याध्यापक आणि एका विद्यार्थिनीबद्दल काही अश्लील शब्द लिहिलेले होते. मात्र त्यानंतर शिक्षकांनी केलेल्या अशा घृणास्पद कृत्याचा परिणाम विद्यार्थिनींवर होऊ शकतो. मुलाच्या प्रतिष्ठेशी छेडछाड करणे हे कायदा आणि संविधानाच्या विरुद्ध आहे. उत्तर प्रदेशमध्येही अशी अनेक प्रकरणे भूतकाळात घडली आहेत, जिथे शिक्षेच्या नावाखाली विद्यार्थिनींना त्यांच्या सलवार काढायला लावल्या जात होत्या. अशा घटनांमुळे काही प्रश्न उपस्थित होतात, ज्यांची उत्तरे आपल्याला स्वतःला विचारावी लागतील.

मासिक पाळी येणे हा गुन्हा आहे का, ज्याचा अशा प्रकारे 'तपास' केला पाहिजे? ही एक सामान्य शारीरिक प्रक्रिया आहे. मुलींना मासिक पाळीबद्दल योग्य माहिती दिली पाहिजे; परंतु त्यांना सार्वजनिक ठिकाणी लाज वाटेल, असे वर्तन केले जाते. शिक्षकांच्या अशा वर्तनामुळे आपल्या शाळा मुलांसाठी सुरक्षित आहेत का, मुलांची काळजी घेणारे शिक्षक आणि मुख्याध्यापक असे कसे करू शकतात असे प्रश्न निर्माण होतात. २०२५ मध्येही आपण मुलींना मासिक पाळीबद्दल लाज वाटायला लावणारे काही शिकवू का, असे प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतात. ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या शाळेतील घटना ही केवळ एका शाळेची कहाणी नाही. आज सर्वात जास्त बदलण्याची गरज असलेल्या आपल्या समाजाच्या विचारसरणीचे हे चित्रण आहे. आपले भविष्य घडवण्यासाठी शाळेत गेलेल्या मुलींच्या मनात अशी जखम झाली आहे की ती भरून येणे खूप कठीण होईल. १८ मार्च २०२४ रोजी बंगळुरू येथील एका शाळेत एका शिक्षिकेच्या पर्समधून दोन हजार रुपये गायब झाले. तेव्हा तिने संशयातून एका विद्यार्थिनीचे कपडे उतरवून शोध घेतला. या अपमानामुळे धक्का बसून तिने दोन दिवसांनी आत्महत्या केली. तीन ऑगस्ट २०२४ रोजी इंदूर येथील एका शाळेत परीक्षेदरम्यान एका विद्यार्थिनीचा मोबाईल फोन वाजला. तेव्हा एका शिक्षिकेने परिक्षा देणाऱ्या इतर सर्व मुलींना बाथरूममध्ये नेले आणि कपडे काढून शोध काही लपवले आहे का, हे शोधण्यास भाग पाडले.



पुढील काळात मुलींच्या पालकांनी या विरोधात पोलिस तक्रार दाखल केली. या घटनेची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीला तक्रार खरी असल्याचे आढळून आल्यावर संबंधित शिक्षिकेला शाळेतून काढून शिक्षण विभागात बदली करण्यात आली. १२ जानेवारी २०२५ रोजी शाळेतील एका कार्यक्रमादरम्यान, धनबाद (झारखंड) येथील एका शाळेच्या मुख्याध्यापकांनी दहावीच्या ८० विद्यार्थिनींना त्यांचे शर्ट काढून फक्त ब्लेझर घालून घरी जाण्यास भाग पाडले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांनी शाळेत येऊन गोंधळ घातला. १२ मार्च २०२५ रोजी मध्य प्रदेशमधील रायसेन येथील उदयपुरा येथे एका शिक्षिकेने दहावीच्या परिक्षेप्रसंगी एका विद्यार्थिनीला शोध घेण्याच्या नावाखाली वर्गात कपडे उतरवण्यास भाग पाडले; विद्यार्थिनीने विरोध केला तेव्हा तिला वर्गाबाहेर हाकलून देण्यात आले. या घटनेमुळे धक्का बसलेली विद्यार्थिनी शाळेच्या आवारातच पडली आणि तिच्या वडिलांना आणि भावाला फोनवरून माहिती दिली. ३० मार्च २०२५ रोजी अमेठी येथील बहादूरपूर येथील एका शाळेत एका विद्यार्थिनीने ३० रुपये चोरीस गेल्याची तक्रार केल्यानंतर एका शिक्षिकेने सातवीच्या विद्यार्थिनीला कपडे उतरवायला भाग पाडून झडती घेतली आणि पैसे न मिळाल्यावर जातीवाचक शिवीगाळ करून धमकी दिल्याने पीडिता नैराश्यात गेली. त्यानंतर मुलीच्या आईने शाळा व्यवस्थापनाविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली. शोधाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना अपमानित करण्याच्या अशा घटना ही गंभीर चिंतेची बाब आहे. ती शिक्षकांच्या एका गटात मूळ धरत असलेल्या असंवेदनशीलतेचा परिणाम आहे. असे वागणाऱ्यांवर कठोर कारवाईची गरज आहे.

✦✦✦

---

**अलिकडे दोन चित्रपटांच्या निमित्ताने समाजात वाद रंगला. त्यात चित्रपट परीनिरीक्षण मंडळ तसेच इतर संस्था मर्यादाभंग करत असून अभिव्यक्तीस्वातंत्र्य संकुचित करत आहेत. चित्रपटाला 'जानकी' हे नाव दिल्याने धर्माचा अवमान कसा होतो, असा सवाल न्यायालयानेही केला. 'उदयपूर फाईल्स' चित्रपटाच्या बाबतीतही असेच होत आहे. वस्तुतः समाजाने कलाकृती आणि वास्तवातील फरक समजून घ्यायला हवा.**

# अधिकारांचा मर्यादाभंग

विश्लेषण

राही भिडे

ज्येष्ठ पत्रकार

चित्रपट तसेच कलाकृतीतील रचनात्मकता, आशय नेहमी लक्षात घेतला पाहिजे. चित्रपट किंवा अन्य कलाकृतीकडे केवळ मनोरंजन म्हणून पाहिले पाहिजे. अर्थात ऐतिहासिक कथानकांचा त्याला अपवाद करावा लागेल. 'जानकी व्हर्सेस केरळ' आणि 'उदयपूर फाईल्स' या चित्रपटांच्या बाबतीत अलिकडे उद्भवलेला वाद चुकीचा आहे. एखाद्या पात्राचे नाव देव, देवतासारखे असले म्हणजे लगेच त्याचा संबंध संबंधित देवतांशी, देवाशी जोडणे चुकीचे आहे. पात्राचे नाव काय यापेक्षा त्याच्या वाट्याला काय भूमिका आली आणि त्याने ती कशी साकारली, याला महत्त्व देण्याऐवजी नावावरून वाद घालायचा, एखाद्या वाक्याला आक्षेप घ्यायचा हे चुकीचे आहे. कमल हसन यांच्या चित्रपटाबाबत सर्वोच्च न्यायालयाने भाषिक आणि अन्य वाद तसेच चित्रपटाला बंदी घालण्यावरून चांगलीच कानउघडणी केली होती, तरीही न्यायालये सर्वोच्च न्यायालयाच्या विपरीत भाष्य करतात. राज्यघटनेने मूलभूत स्वातंत्र्य दिले आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व दिले आहे; परंतु आता सरकारच्या यंत्रणाच अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करत आहेत. चित्रपट परीनिरीक्षण मंडळासारा संस्थांना मर्यादांचे भान राहिलेले नाही. चित्रपटात काही अश्लील आहे की नाही, हे पाहून तेवढा भाग वगळण्यास सांगणे समजण्यासारखे आहे; परंतु कार्यकारण भाव माहीत नसताना, कारण माहीत नसताना आणि कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही सरकारची जबाबदारी असताना धोक्यात येण्याचे कारण दाखवून एखाद्या चित्रपटाला परवानगी नाकारणे, त्यात ९६ कट सुचवणे हा मर्यादाभंग आहे.

अलिकडेच चित्रपट परीनिरीक्षण मंडळाने 'जानकी' या चित्रपटामध्ये ९६ दृश्ये कपात करण्याची सूचना केल्यानंतर संबंधित निर्मात्याने काय दाखवायचे, हा प्रश्न पडला. उच्च न्यायालयाने कानउघाडणी केल्यानंतर आता चित्रपट परीनिरीक्षण मंडळाने फक्त दोन किरकोळ बदलांसह चित्रपटाला मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. काही मुद्दे चुकीचे आहेत, असे केवळ वाटल्याने चित्रपटाची परवानगी रोखून धरणेच चुकीचे आहे. या चित्रपटाच्या नावाबाबत 'जानकी' असे नाव असण्यावर सर्वात मोठा वाद होता. यापूर्वी अनेक चित्रपटांमध्ये जानकी, सीता, राम, तसेच अनेक देवतांची नावे सामान्य पात्रांना देण्यात आली होती. त्यावर यापूर्वी वाद, दंगली असे काही घडले नाही. मग आताच असे होण्याचा धाक का बाळगायचा, असा साधा प्रश्न चित्रपट परीनिरीक्षण मंडळाला पडला नाही. त्यातच चित्रपट मान्यतेशी संबंधित दोन वेगवेगळ्या संस्थांनी याबाबत दोन वेगवेगळे निर्णय दिल्यामुळे संदिग्धता वाढली.

'जानकी' चित्रपटातील पात्राचे नाव रामायणातील सीतेच्या नावाशी जोडलेले आहे. लैंगिक छळाला सामोरे जाणाऱ्या महिलेच्या व्यक्तिरेखेसाठी 'जानकी' हे नाव वापरणे अयोग्य आहे, असा आक्षेप चित्रपट परीनिरीक्षण मंडळाने घेतला आहे. हे प्रकरण केरळ उच्च न्यायालयात पोहोचले. केरळ उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान चित्रपट परीनिरीक्षण मंडळाच्या वतीने उपस्थित असलेल्या वकिलाने सांगितले की आता हा चित्रपट फक्त दोन बदलांसह मंजूर केला जाईल. पहिला बदल म्हणजे चित्रपटाचे शीर्षक थोडे बदलले जाईल. आता चित्रपटाचे नाव जानकी व्ही विरुद्ध केरळ राज्य किंवा व्ही जानकी विरुद्ध केरळ राज्य असे असेल. यामुळे हे स्पष्ट होईल की जानकी हे नाव देवीशी संबंधित नाही, तर मुख्य पात्र जानकी विद्याधरनशी संबंधित आहे. दुसरा बदल न्यायालयीन कक्षात सुरू असलेल्या उलटतपासणीच्या दृश्याशी संबंधित आहे, त्यात नायिकेचे नाव म्यूट करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यावर न्यायालयाने चित्रपट निर्मात्यांकडून उत्तर मागितले. मुंबई विभागाने चित्रपटाला आक्षेप घेतला असला, तरी केरळ विभागाने कोणताही बदल न करता चित्रपट मंजूर केला. यामुळे हे स्पष्ट होते की देशाच्या वेगवेगळ्या भागात सेन्सॉरशिपचे नियम वेगवेगळ्या प्रकारे लागू केले जातात. ते चित्रपट निर्मात्यांसाठी एक मोठे आव्हान बनत आहे.




'जानकी व्ही विरुद्ध केरळ राज्य' मध्ये केंद्रीय पेट्रोलियम राज्यमंत्री सुरेश गोपी आणि अनुपमा परमेश्वरन मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटावरून एवढा वाद होऊनही गोपी यांनी त्याबाबत मौन बाळगले. वास्तविक, अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत गेल्या महिन्यात आणीबाणीचे उदाहरण देऊन भाजपने मोठा आवाज उठवला होता. आता भाजप सत्तेत असताना आपल्याच मंत्र्यांच्या चित्रपटाबाबत होत असलेल्या अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या गळचेपीबाबत काहीच बोलायला तयार नाही. हा चित्रपट यापूर्वी २० जून रोजी प्रदर्शित होणार होता; परंतु सेन्सॉरच्या वादामुळे पुढे ढकलण्यात आला. आता सेन्सॉर बोर्डाने आपली भूमिका मऊ केली आहे. त्यामुळे हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल अशी अपेक्षा आहे. चित्रपटाच्या निर्मिती कंपनीने केरळ उच्च न्यायालयात धाव घेतली आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाच्या (सीबीएफसी) निर्णयाला आव्हान दिले.

'सीबीएफसी'ने असा आक्षेप घेतल्याबद्दल उच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. धार्मिक संवेदनशीलतेचा हवाला देत 'सीबीएफसी'ने 'जानकी' या शीर्षकावर आणि पात्राच्या नावावर अनौपचारिकपणे आक्षेप घेतल्याचा आरोप करण्यात आला. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती एन. नागरेश यांनी 'सीबीएफसी'च्या युक्तिवादावर आश्चर्य व्यक्त केले. आता 'जानकी विरुद्ध केरळ' लवकरच थिएटरमध्ये दाखल होऊ शकतो. कारण त्याच्या निर्मात्यांनी सीबीएफसीने सेन्सॉर प्रमाणपत्रासाठी सुचवलेल्या बदलांना सहमती दर्शवली आहे. केरळ उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात जानकी हे पात्र बलात्कार पीडित म्हणून दाखवले आहे, असे नमूद करून म्हटले आहे की न्यायाच्या शोधात तिला अनेक वेदनादायक प्रसंगांना तोंड द्यावे लागले आहे. मुख्य पात्राला बलात्कारपीडित म्हणून एका पूजनीय देवीचे नाव देऊन दाखवले जाते, ही सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी गंभीर चिंतेची बाब आहे. हे देवी सीतेच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडलेली प्रतिष्ठा आणि पावित्र्य कमी करते, असे नमूद केले आहे. चित्रपटातील एखाद्या पात्राला जानकी नाव दिल्याने सीतेचे पावित्र्य कसे कमी होते, ते इतके तकलादू होते का, रामाने सीतेचा त्याग केल्यानंतर ते कमी झाले नाही, रावण ते करू शकला नाही, आता ते कसे कमी होणार, या प्रश्नाचे उत्तर मंडळाने दिलेले नाही.

चित्रपटात मुख्य पात्राची तिच्यावरील हल्ल्याबद्दल उलटतपासणी केली जात असताना बचाव पक्षाचे वकील आक्रमक प्रश्न विचारतात, जसे की ती अश्लील चित्रपट पाहते का, लैंगिक सुख वाढवण्यासाठी ती कोणतेही औषध घेते का, तिचा प्रियकर आहे का किंवा हल्ल्यापूर्वी ती गर्भवती होती का? जानकी नाव असलेल्या पात्राला असे उत्तेजक प्रश्न विचारल्याने सार्वजनिक सुव्यवस्थेचा भंग होण्याची आणि धार्मिक भावना दुखावण्याचा साक्षात्कार मंडळाला कुणाच्याही आक्षेपाआधीच झाला. कथानकात दाखवल्यानुसार बलात्कार झाल्यानंतर या स्त्रीला एका विशिष्ट धार्मिक समुदायातील व्यक्ती मदत करते आणि दुसऱ्या धार्मिक समुदायातील व्यक्ती तिची उलटतपासणी करते आणि कठोर प्रश्न विचारते. हा धार्मिक विरोधाभास सांप्रदायिक तणाव निर्माण करण्याची आणि धार्मिक गटांमध्ये फूट पाडणारी कथा निर्माण करण्याची शक्यता आहे. निर्मात्यांनी तिच्या धार्मिक ओळखीचा फायदा घेण्याच्या स्पष्ट हेतूने हे नाव निवडले आहे. 'सीबीएफसी'चा हा युक्तिवाद पाहता ही प्रमाणपत्र देणारी संस्था आहे की कट्टर हिंदुत्त्ववादी संघटना असा प्रश्न निर्माण होतो.

दरम्यान, 'उदयपूर फाइल्स' या वादग्रस्त चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्यासाठी दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. हा चित्रपट उदयपूरमध्ये मुस्लिम समुदायाच्या लोकांनी हत्या केलेल्या शिंपी कन्हैया लालवर आधारित आहे. हत्येचे अकरा आरोपी तुरुंगात आहेत आणि खटला सुरू आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर 'उदयपूर फाइल्स'हा चित्रपट वादात सापडला. कन्हैयालाल हत्या




प्रकरणातील आठवा आरोपी मोहम्मद जावेद याने चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्यासाठी याचिका दाखल केली होती. ती सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने या याचिकेवर तात्काळ सुनावणी केली. या प्रकरणातील आरोपी मोहम्मद जावेद व्यतिरिक्त 'जमियत उलेमा-ए-हिंद'चे अध्यक्ष आणि 'दारुल उलूम देवबंद'चे प्राचार्य मौलाना अर्शद मदनी यांनी दिल्ली उच्च न्यायालयात चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली. तिथे स्थगिती मिळाली. म्हणजेच एखाद्या चित्रपटात एखाद्या घटनेशी संबंधित विषयावर चित्रपट निघाला, म्हणजे तिचा न्यायव्यवस्थेवर परिणाम होतो, असा नवा जावईशोध लागला आहे.

✦✦✦

# सर्वोत्तम राज्यावर वाढती जबाबदारी

**महाराष्ट्राने २०२४-२५ मध्ये विक्रमी १.६५ लाख कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली. ती देशातील एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के आहे. ही ऐतिहासिक कामगिरी स्थिर धोरणे, सक्षम नेतृत्व आणि उत्कृष्ट पायाभूत सुविधांचा परिणाम आहे. राज्यातील औद्योगिक विकास, कुशल मनुष्यबळ आणि प्रगत दळणवळण व्यवस्था गुंतवणूकदारांना आकर्षित करत आहे. या गुंतवणुकीमुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल.**

देशाच्या आर्थिक नकाशावर आपला ठसा कायम ठेवत महाराष्ट्राने परकीय थेट गुंतवणुकीच्या शर्यतीत पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावले. या परकीय थेट गुंतवणुकीमुळे राज्याने पुन्हा भारताच्या आर्थिक मांडणीत आपले स्थान भक्कम केले. यातून स्थानिक रोजगारनिर्मितीला हातभार लागणार आहे. महाराष्ट्राने २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १,६४,८७५ कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक आकर्षित केली. ही गुंतवणूक देशात आलेल्या एकूण ४,२१,९२९ कोटी रुपयांपैकी तब्बल ४० टक्के




आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीमध्ये महाराष्ट्रात २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक आली होती. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले आहे. मागील तपशील पाहिला तर मागील दहा वर्षांमधील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांमध्येच ओलांडला गेला आहे. महाराष्ट्रापाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कर्नाटकमध्ये ५६,०३० कोटी रुपये थेट परदेशी गुंतवणूक झाली आहे. म्हणजे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य महाराष्ट्राच्या निम्मा आकडाही गाठू शकलेले नाही. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीने ५१,५४० कोटी तर गुजरातने ४७,९४७ कोटी रुपयांची गुंतवणूक मिळवली आहे. म्हणजेच महाराष्ट्र निर्विवाद आघाडीवर आहे.

परकीय गुंतवणूकदार महाराष्ट्राकडे आकर्षित होण्यामागे अनेक कारणे आहेत. महाराष्ट्रात औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळ यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यास अनेक संधी आहेत. महाराष्ट्र हे देशातील असे अग्रेसर औद्योगिक राज्य आहे, ज्याचे राज्याच्या सकल राज्य उत्पादनात १४ टक्क्यांहून अधिक योगदान आहे. मुंबईमध्ये भारतातील सर्वात मोठे आणि आशियातील सर्वात जुने स्टॉक एक्सचेंज (मुंबई रोखे बाजार) आहे. राज्यात चांगले रस्ते, रेल्वे आणि विमानतळ नेटवर्क आहे. त्यामुळे वाहतूक आणि संपर्क साधणे सोपे होते. विविध उद्योगांसाठी आवश्यक असलेले पाणी, वीज, जमीन आणि जागा राज्यामध्ये उपलब्ध आहे. राज्यात उच्चशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ आहे. गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन आणि अनुदान उपलब्ध आहे. राज्यात मजबूत कनेक्टिव्हिटी आणि ग्राहकांची भरभक्कम मागणी आहे. औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि इतर फायद्यांमुळे हे राज्य गुंतवणुकीसाठी एक योग्य ठिकाण आहे. त्याचप्रमाणे राज्यात दळणवळ-णाची साधने विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. उत्तम भौगोलिक आणि आर्थिक परिस्थिती, अद्ययावत तंत्रज्ञानाची उपलब्धता यामुळे महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी एक उत्तम पर्याय ठरतो. राज्यात तांत्रिक कुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात आहे. तरुण-तरुणींना वेगवेगळ्या प्रकारचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यावर राज्य सरकारने भर दिला आहे. त्यांच्या कौशल्याचा उपयोग महाराष्ट्रात उद्योग उभारू इच्छिणाऱ्या उद्योगांना होत आहे. कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा तसेच महिलांचा विकास आणि परकीय गुंतवणुकीचे क्षेत्र अशा सात पैलूंमुळे हे राज्य दिवसेंदिवस उद्योगपूरक होत चालले आहे.

महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणुकीसाठी करण्यात येणाऱ्या परस्पर सामंजस्य करारांपैकी ९० टक्के करारांची अंमलबजावणी केली जात आहे. अशा प्रकारे करारांची अंमलबजावणी करण्यामध्ये राज्याचा पहिला क्रमांक असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिली. २०२५ च्या दावोस जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राबरोबर वेगवेगळ्या कंपन्यांनी केलेल्या ४६ करारांपैकी १५ उद्योगांना जमिनीचे वितरण करण्यात आले आहे. सात उद्योगांना जमीन देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून २० उद्योग पसंतीच्या जमिनींसाठी प्रती-क्षेत आहेत. गडचिरोली हा नक्षलवादग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. परंतु लवकरच पोलादनगरी म्हणून जगाला त्याची ओळख होईल, अशी सरकारला अपेक्षा आहे. गडचिरोलीमध्ये एक लाख कोटी रुपयांची



गुंतवणूक केली जात आहे. पण तेथील पर्यावरण विनाशाबद्दलही बातम्या येत आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये ६० हजार कोटी तर रत्नागिरी जिल्ह्यात ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्यात महायुतीचे सरकार यशस्वी ठरल्याचे सरकारचे म्हणणे आहे. परंतु गडचिरोली व्यतिरिक्त राज्याच्या इतर मागास भागांमध्येदेखील उद्योगधंदे यायला हवेत. पुण्यात हिंजवडीसारख्या आयटीनगरीतच दोन, दोन दिवस वीज नसते, रस्त्यांवर खड्डे असतात. ठिकठिकाणी पाणी साचते. या पावसाळ्यात नागपूर या उपराजधानीच्या शहरातही अनेक भागात आणि औद्योगिक वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याच्या तक्रारी आहेत. खराब रस्ते, कमकुवत पूल, अतिक्रमणे यामुळे प्रवासी आणि मालवाहतुकीत बाधा येते. याचा व्यापार आणि उद्योगधंद्यांना थेट फटका बसतो, हे राज्य सरकारने लक्षात घेतले पाहिजे.



**हेमंत देसाई**
**ज्येष्ठ पत्रकार**

मुख्यमंत्री रोजगार योजनेंतर्गत २२ हजार नवीन उद्योजक तयार झाले आहेत आणि जिल्ह-स्तरावर जिल्हा उद्योग परिषद हा उपक्रम सरकारने सुरू केला आहे. त्या अंतर्गत स्थानिक उद्योजकांमार्फत सव्वा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. मुख्यमंत्री रोजगार योजनेत ओबीसी आणि अपंग घटकांचाही अंतर्भाव आहे. त्यांना स्टार्टअप उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या सुविधा दिल्या जाणार आहेत. तसेच उद्योग विभागातर्फे प्रत्येक विभागात उभारलेली कौशल्य केंद्रे लवकरच सुरू होणार आहेत. मात्र नव्या उद्योजकांना पायाभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे. आज राज्यात तळेगावसारख्या ठिकाणीही वारंवार वीज जाते. दुर्गम भागात परिस्थिती आणखी कठीण आहे. सरकार नवनवीन योजना जाहीर करते, परंतु त्यांची अंमलबजावणी नीट होत नाही, हा वर्षानुवर्षांचा अनुभव आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये वाहन क्षेत्रात ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित झाली आहे, ही चांगली बाब आहे. तेथे बजाजसारख्या प्रकल्पांनी औद्योगिक परिवर्तन आणले. त्यालाही काही दशके लोटली. परंतु संभाजीनगरमध्ये उद्योजकांकडून खंडणी मागण्याचा उद्योग तेजीत आहे. केवळ तेथेच नाही, तर नाशिक, पुणे, नागपूर अशा अनेक ठिकाणांहूनही अशा तक्रारी येत आहेत. कोणी खंडणी मागितल्यास खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला असला, तरी तळपातळीवरची परिस्थिती वेगळी आहे.

आज मुंबई, पुणे, नाशिक येथे आयटी, औषधनिर्मिती, जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांचा वेगाने विकास होत आहे. संभाजीनगरमध्ये ई वाहनांची निर्मिती जोरात आहे. संभाजीनगर हे शहर भार-ताची पहिली स्मार्ट औद्योगिक वसाहत म्हणूनही प्रसिद्ध झाले आहे. लवकरच हे शहर भारतातील विद्युत वाहनांची राजधानी म्हणून ओळखले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रामध्ये विद्युत उत्पादने, डेटाबेस उत्पादने आणि एरोस्पेससारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आकर्षित होत आहे. हरित तंत्रज्ञान, डेटा सायन्स, रोबोटिक्स या क्षेत्रांमध्ये तरुणांना उत्तम शिक्षण मिळाल्यास महाराष्ट्रात हे उद्योग फुलतील, यात शंका नाही. सुदैवाने नवी मुंबई येथे सेमीकंडक्टर चीपनिर्मितीचा प्रकल्प सुरू होणार आहे. विदर्भात कापसाचे उत्पादन चांगले आहे. त्यामुळे तेथे वस्त्रोद्योग क्षेत्र विकसित होण्यास वाव आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमधील धार्मिक पर्यटन वाढणार आहे. आता संरक्षण क्षेत्रात देशी उद्योगांना वाव मिळू लागला असून नाशिकमध्ये संरक्षण उत्पादन निर्मितीचे अनेक प्रकल्प येत आहेत. यापूर्वी उत्तर प्रदेश आणि तामिळनाडू ही संरक्षणक्षेत्रातील साहित्यनिर्मितीचे निर्मितीची प्रमुख केंद्रे बनली होती.

आज पुणे, रायगड आणि नवी मुंबई भागात पायाभूत सुविधांचा विकास होत असून नवी मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळही होत आहे. त्यामुळे जगभरातील बड्या आयटी कंपन्या तिथे येत असून भविष्यकाळात हा विभाग डेटा सिटी म्हणून ओळखला जाईल, असे चित्र आहे. वाढवण येथे नवे बंदर होत असून त्याची क्षमता जेएनपीटीपेक्षा तिपटीने जास्त असणार आहे. जगा-तील दहा मोठ्या बंदरांमध्ये हे बंदर समाविष्ट असेल. परंतु मच्छिमार कृती समितीचा या बंदराला विरोध असून काही दिवसांपूर्वी त्यांनी आंदोलन देखील केले. मोठमोठी जहाजे आल्यामुळे मासेमारी करता येणार नाही, अशी त्यांची भीती आहे. जेएनपीटी अस्तित्वात आले, तेव्हा या परिसरात नवे बंदर आणले जाणार नाही, असे आश्वासन मिळाले होते, असे मच्छिमारांचे म्हणणे आहे. मात्र मच्छिमारांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्यास, त्यांच्या यथायोग्य पुनर्वसनाची सोय शासनाला करावीच लागेल. एकंदरीत, विविध मर्यादांवर मात करत महाराष्ट्र देशातले गुंतवणुकीसाठी सर्वाधिक योग्य राज्य म्हणून नावलौकीक कमावत आहे; फक्त या प्रवासाआड येणाऱ्या अडथळ्यांची गांभिर्याने नोंद घ्यायला हवी.

✦✦✦

**आजचे बारा वर्षांचे शालेय शिक्षण नवीन तंत्राने आठ वर्षांमध्ये देता येईल. संगणकीकृत दूरशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना स्वस्त उच्च शिक्षणाकडे वळता येईल. शिक्षित आणि रोजगारांचे प्रमाण वाढले, पुरेशी अर्थप्राप्ती होऊ लागली की सामाजिक वातावरणात फरक पडून शांतता नांदेल आणि एकी वाढेल. या परिवर्तनाची दिशा समजून घेऊन पालकांनी मुलामुलींना पुस्तकातले किडे न बनवता नानाविध कौशल्ये आत्मसात करू द्यायला हवीत.**

# शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलावा




आजघडीला आपला देश संक्रमणावस्थेतून जात आहे. विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत, ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे, परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रितीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते 'वसुधैव कुटुंबकम' ही आपली संस्कृती असून देशाच्या कामगिरीचा प्रभाव सध्या संपूर्ण जगावर पडत आहे. जगाच्या कल्याणासाठी भारताचे मोठे योगदान आहे. १२ मे २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'आत्मनिर्भर भारत' अभियानाची हाक दिल्यापासून विविध प्रसारमाध्यमांमधून त्याबाबत चर्चा सुरू आहे. स्वावलंबी भारत अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, २१ व्या शतकातील तंत्रज्ञानाद्वारे चालवलेल्या व्यवस्थांवर आधारित पद्धत, व्हायब्रंट डेमोग्राफी (युवा सामर्थ्य) आणि मागणी या पाच स्तंभांवर उभा असेल. याद्वारे आमच्या मागणी आणि पुरवठा साखळीची ताकद संपूर्ण क्षमतेसाठी वापरली जावी, अशी अपेक्षा आहे. सध्याच्या वैश्विकरणाच्या जमान्यात अर्थातच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय अशी कप्पेबंदी करता येणार नाही. जागतिक पुरवठा साखळीत आपल्याला महत्त्वाची भूमिका निभावता येईल, अशी बारा क्षेत्रे अधोरेखित केली गेली आहेत. अन्न प्रक्रिया, सेंद्रिय शेती, लोह, अल्युमिनियम आणि तांबे, कृषि-रसायने, इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक यंत्रसामग्री, फर्निचर, चर्मोद्योग, ऑटोमोबाइल पार्टस, वस्त्रोद्योग आणि मुखावरणे, सॅनिटायझेशन आणि वेंटिलेटर्स ही ती क्षेत्रे आहेत.

संगणकापासून संरक्षण उत्पादनांपर्यंत आपण आत्मनिर्भर झालो, 'मेक इन इंडिया'चा आग्रही पुरस्कार करत स्वतःच्या पायावर उभे राहिलो, तर भविष्यात उद्भवू शकणाऱ्या सर्व पेचप्रसंगांना यशस्वीपणे तोंड देऊ शकू. ऊर्जा, पाणी, संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान, औषध निर्माण अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपण आणखी आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करावे लागेल. स्थानिक मनुष्यबळाची मानसिकता बदलावी लागेल आणि त्यांनी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतील. या दिशेने प्रयत्न करणे हा आत्मनिर्भर होण्यासाठीच्या धडपडीचाच भाग ठरेल. आपण एक आर्थिक महासत्ता होण्याचा प्रयत्न करू आणि या मोहिमेत आपले लढवय्ये असतील हे कुशल मोहरे. माझ्या दृष्टीने आयटी या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट. देशाची वाढती लोकसंख्या ही प।हल्यापासून एक फार मोठी समस्या मानली गेली असून त्यानुसार, लोकसंख्या काबूत ठेवण्यासाठी २५-३० वर्षांपूर्वी कुटुंब नियोजन, नसबंदी शस्त्रक्रिया वगैरे उपायही केले गेले. त्या काळातली विचारप्रणाली वेगळी होती. इतक्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन जागतिक पातळीवर आर्थिक सत्ता बनण्यासाठी करता येईल हे फारसे कोणाला सुचले नाही.

आज मात्र वेगळ्या दिशेने विचार करून आपल्याकडे भरपूर प्रमाणात असलेल्या मनुष्यबळाचा योग्य रितीने वापर करण्याची वेळ आली आहे. तरूणवर्गाची इतकी मोठी संख्या असलेले फारच थोडे देश जगात आहेत. जगातील बहुसंख्य देशांमधल्या नागरिकांचे सरा-सरी वयोमान वाढत चालले असून झपाट्याने मध्यमवयीन बनणाऱ्या या जगातला तरुणाईचा फार मोठा साठा आपल्याकडे आहे. ही फार महत्त्वाची जमेची बाजू आहे. या तरूणवर्गाला योग्य प्रशिक्षण दिले गेले की त्यांच्याकडून देशाच्या अर्थकारणात मोठे सकारात्मक बदल घडवून आणता येतीलच, शिवाय हे तरूण-तरूणी जागतिक पा-तळीवर काम करतील तेव्हा भरपूर पैसा कमावतील आणि त्यापैकी मोठा हिस्सा, बचतीच्या रूपाने, भारतात परत पाठवतील. यामुळे भारताचे सकल उत्पन्न म्हणजेच जीडीपी तसेच उत्पादकताही वाढेल आणि इथल्या तरूणवर्गाच्या निर्मितिक्षम मनाला संधीही उपलब्ध होतील. आज भारतात दिसणाऱ्या परिवर्तनांमध्ये आणि घडामोडींमध्ये या मानवी भांडवलाचा फार मोठा हिस्सा तर आहेच, परंतु महत्त्वाचे म्हणजे गेल्या काही वर्षांमधील एकंदर अस्थिर स्थितीमधून पुन्हा जोमाने वर येण्यासाठी देशाला या जोमदार, चळवळ्या लोकांचाच उपयोग होणार आहे. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, जैवतंत्रज्ञान, आरोग्य... संपूर्णपणे कात टाकलेल्या किंवा नव्याने वर आलेल्या या क्षेत्रांकडे नजर टाका, म्हणजे आपल्याला नक्कीच फरक जाणवेल.




आज प्रस्थापित उद्योगक्षेत्रांमध्येही नवे धडाडीचे उद्योजक येऊन अभूतपूर्व यश मिळवत आहेत. मुख्य म्हणजे आजच्या या उद्योजकांना जागतिकीकरण, स्पर्धा इत्यादींची भीती वाटत नाही. उलट, पूर्वजांच्या सुरक्षित कोशांमधून आणि बंद किल्ल्यांमधून बाहेर पडून ते आज जगातल्या विविध कंपन्या धडाक्याने विकत घेत आहेत किंवा त्यांच्याशी आर्थिक-तांत्रिक सहकार्य करून आत्मविश्वास आणि दूरदृष्टीने गुंतवणूक करत आहेत. आज येथील आयटी उद्योगाच्या विस्तारामुळे भारताला आशियातील सिलिकॉन व्हॅली मानले जाते ते उगीच नाही. यानंतर आपल्याकडे बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल सायन्स तसेच तंत्रज्ञानाच्या इतर बाबींमध्ये नवीन ज्ञान आणि उद्योगशाखांचे विस्तारीकरण सुरू होईल. यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक क्षमता वाढेल आणि शिकलेल्या तरुण पिढीला रोजगाराची मोठी संधी निर्माण होईल. दर्जेदार व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रमाण वाढल्यास आणि सरकारी पातळीवरही पुरेसे प्रयत्न आणि वचनबद्धता दिसली तर २०३० पर्यंत सर्वांना रोजगार मिळणेही शक्य होईल. अर्थात या फार मोठ्या संधीचा फायदा मिळवण्यासाठी आपणा सर्वांनाच मनोवृत्ती आणि कामाची पद्धत बदलावी लागेल. तसे न झाल्यास धोरणांच्या अंमलबजावणीतल्या सुस्त आणि संथपणामुळे लोकसंख्या हे देशापुढचे फार मोठे संकट राहील.



**डॉ. दीपक शिकारपूर**

आपल्याला सर्वप्रथम शिक्षणाबाबतची, विशेषतः उच्च शिक्षणाबद्दलची पारंपारिक विचारपद्धती टाकून देऊन शिक्षणाला मुक्त करावे लागेल. बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीही लवचिक आणि बदलत्या गरजा वेगाने सामावून घेणारी असायला हवी. जागतिकीकरणाचे फायदे हवे असतील तर आपल्या मुलामुलींना जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे लागेल. जागतिक पातळीवरील रोजगारांची चाहूल लागली की आपल्याकडील युवकवर्ग इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी यासारख्या भाषा शिकायला फक्त तयार होतील असे नव्हे, तर उत्सुक बनतील. यासाठी प्रचंड प्रमाणावर शिक्षक लागतील हे खरे आहे परंतु नेमक्या याच ठिकाणी आपण इ-शिक्षण, आभासी शाळा (व्हर्च्युअल क्लासरूम) अशा बाबींचा वापर करू शकतो. माहिती तंत्रज्ञान सक्षमित शिक्षणपद्धतीचा आपल्याला मोठा उपयोग होणार आहे. इथे केरळचे उदाहरण देता येईल. जवळजवळ प्रत्येक कुटुंबातली एक व्यक्ती परदेशी चलन कमावत असल्याने केरळचा चेहरामोहरा बदलला आहे. महाराष्ट्रात हे घडवणे अजिबात अशक्य नाही, परंतु एकीकडे शेतीवर अवलंबून राहणे कमी करा असे तरूणांना सांगताना रोजगाराचा त्याहून चांगला पर्याय देणे आवश्यक आहे. जपान ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असून एक वृद्ध देश आहे. या देशाचे सरासरी आयुर्मान सुमारे ८० पेक्षा अधिक आहे. फक्त भाषेचा अभ्यास व जपानी चालीरितींचा सराव याच्या जोरावर कुठलाही भारतीय जपानमध्ये करिअर करू शकतो.

शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र पुसण्याची आणखी एक पायरी आपल्याला येत्या काळामध्ये ओलांडावी लागेल. शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झाल्यास शिक्षणाच्या किंवा शिक्षकाच्या दर्जाबाबतची मोठी चिंता तर मिटेलच, शिवाय शिक्षण देण्या-घेण्याच्या वेगामध्येही बदल होतील. शालेय शिक्षणाची आज आपण बारा वर्षे मानतो, परंतु तेवढेच शिक्षण नवीन तंत्राने आठ वर्षांमध्ये देता येईल. आता संगणकीकृत दूरशिक्षणाला मोठी मागणी येत असून या मार्गाने देशभरातल्या दूरदूरच्या हजारो विद्यार्थ्यांना, वाजवी किंमतीत, उच्च शिक्षणाकडे वळणे शक्य येईल. शिकलेल्या लोकांचे आणि रोजगारांचे प्रमाण वाढले आणि त्यातून सर्वांना पैसा मिळू लागला की भारतातल्या एकंदर सामाजिक वातावरणात फरक पडेल, शांतता नांदेल आणि एकी वाढेल. देशातील सर्वच लोकांच्या हाती पुरेसा पैसा खेळू लागला की ते बाहेरील फुटीरतावादी शक्तींना बळी पडणार नाहीत. देशात येऊ घातलेल्या या परिवर्तनाची दिशा समजून घेऊन पालकांनी मुलामुलींना शिक्षण देण्याबाबतच्या स्वतःच्या दृष्टिकोनात योग्य ते बदल करायला हवेत. त्यांना पुस्तकातले किडे न बनवता हरहुन्नरी होऊन जगात आत्मविश्वासाने वावरण्यासाठी लागणारी सर्व कौशल्ये आत्मसात करू द्यायला हवीत.

deepak@deepakshikarpur.com
(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

✦✦✦

महासागर
# साहित्य मैफल
रविवार, दिनांक २० जुलै २०२५ ■ पान ०३

## : डिजिटल विश्व :
# आर्थिक फसवणुकीपासून सावध व्हा!

प्रा. डॉ. जयश्री जाधव-कदम
९८८१९३८८५८

आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाने समाज प्रगतशील बनला आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात दिवसेंदिवस जणू काही मानवाला आकाशाला स्पर्श करायला दोन बोटे बाकी आहे असे म्हणायला हरकत नाही.

नवनवीन तांत्रिक सुधारणांनी मानवाची छाती अधिकच फुलत चालली आहे. आज जागतिक स्पर्धेत टिकवण्यासाठी प्रगत अत्याधुनिक माहिती-तंत्रज्ञानाची अत्यावश्यकता हवी आहेच पण तंत्रज्ञानाच्या वाढत्या सोयी-सुविधांमुळे मानवाला मिळणाऱ्या सेवा सुलभ झाल्याने चांगल्यां बरोबरच वाईट प्रवृत्तीचा उदय झालेला आहे.

तांत्रिक सुधारणावादी युगात गुन्हेगारीत वाढ होत आहे. गुन्हेगारींमध्ये गुन्हेगार ना श्रीमंतांना सोडत ना गरिबांना, कित्येक गुन्हे तर कागदावर येतच नाही. माझ्या हातून चूक झाली आता समाज काय म्हणेल? नातेवाईक काय म्हणतील? या भीतीपोटी असंख्य गुन्हे उघड होत नाही.

